**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.**

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ४७ इतिवृत्त**

**दिनांक :** ७ एप्रिल २०१७

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक ७ एप्रिल२०१७ रोजी दुपारी २ ते ५.०० या कालावधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , शैक्षणिक इमारत, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पुढील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. संजीवनी महाले — अध्यक्ष, प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
२) डॉ. भूषण कर्डीले — सदस्य, प्राचार्य के.के.वाघ बी.एड. महाविद्यालय
३) डॉ. संजीवनी मुळे — सदस्य , प्राचार्य शा.अ. महाविद्यालय औरंगाबाद
४) डॉ. सज्जन थूल — सदस्य , प्र. संचालक मूल्यमापन विभाग
५) डॉ. माधुरी सोनवंणे — सदस्य व प्राध्यापक कृषी विद्याशाखा
६) डॉ. विजया पाटील — सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
७) प्रा. विजयकुमार पाईकराव - सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
८) डॉ. दयाराम पवार - सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
९) प्रा. सोनुणे सुभाष - सदस्य व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
१०) प्रा. शर्मिष्ठा ओक - निमंत्रित सदस्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा
११) डॉ. कविता साळुंके — सदस्य, सचिव व प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सदर बैठकीस पुढील सहा सदस्यांना उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी कळवले होते.

१) डॉ. रेखा टोपकर — सदस्य, प्राचार्य सांगली बी.एड. महाविद्यालय
२) डॉ. वाय. एस. राव — सदस्य, माजी प्राचार्य जळगाव बी. एड. महाविद्यालय
३) डॉ. नलिनी पाटील — प्राचार्य एस.एन.डी.टी. , बी. एड. महाविद्यालय, पुणे.
४) डॉ. नीला डबीर — विद्वत्त परिषद सदस्य, मुंबई
५) डॉ. सुरेश पाटोळे — सदस्य व प्राध्यापक वाणिज्य विद्याशाखा
६) डॉ. सुरेश पाटील — निमंत्रित सदस्य शिक्षणशास्त्र विद्याशाखा

सदर बैठकीतील उपस्थित सदस्यांचे स्वागत केल्यानंतर कोरम पूर्ण असल्याची खात्री करून त्यानंतर बैठकीस सुरुवात करण्यात आली. त्यात पुढील विषयांवर निर्णय घेण्यात आले.

**४७ .१&२ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१७ /०१ व २**

**दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देणेबाबत.... (सहपत्र क्र. १ व २ )**

**निर्णय** —७ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या ४६ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक इतिवृत्त व कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली.

.३.१ विषय क्र बी.१ / एफ-१७५ / २०१७ /३.१

**बी. एड. शिक्षणक्रम प्रवेशप्रक्रिया नियमांबाबत... (सहपत्र – ३)**

**टिप्पणी** -बी. एड. शिक्षणक्रम प्रवेशप्रक्रियेत अधिकाधिक पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने २०१७ – २०१९ तुकडीपासून बी.एड. प्रवेशनियामांची नव्याने मांडणी केली आहे. सदर नियम सहपत्र – ३ मध्ये चर्चा व मान्यतेसाठी सादर

**निर्णय – विद्याशाखेने तयार केलेल्या बी. एड. प्रवेश नियमांवर चर्चा करताना शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेत अभ्यासकेंद्रनिहाय स्वतंत्र मेरीट लिस्ट असल्याने आरक्षण तक्ताही अभ्यासकेंद्र निहायच विचारात घेण्यात यावा.**

**प्रवेश प्रक्रिया विभागीय केंद्रावर कार्यान्वित न करता ती विद्यापीठात पूर्वीप्रमाणेच कार्यान्वित करावी म्हणजे प्रवेशात गैरप्रकार होणार नाहीत. या सुचनेसह सदर प्रवेश नियमांना मान्यता देण्यात आली आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

**४७.३.२ विषय क्र. बी – १/एफ – १७५/२०१७/३.२**

**बी. एड. शिक्षणक्रम नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या अभ्यासविषयांची तज्ज्ञ सल्लागार आणि विषयनिहाय पाठ्यक्रम समीतीबाबत...(सहपत्र – ४)**

**टिप्पणी** - बी. एड. शिक्षणक्रम अभ्यासक्रम तज्ञ सल्लागार मंडळ व विविध विषयांच्या पाठ्यक्रम विकसन समिती गठीत करण्यात आल्या आहेत.

बी.एड.शिक्षणक्रमातील ज्या अभ्यासविषयांचे नव्याने विकसन करण्यात येणार आहे. ते विषय पुढीलप्रमाणे –

१) अभ्यासक्रमाची भाषा, विद्याशाखा आणि विषयाचे आत्मसातीकरण

२) उदयोन्मुख भारतीय समाज आणि शिक्षण

३) जेंडर, स्कूल आणि सोसायटी

४) एकात्मिक शिक्षण

५) ज्ञान आणि अभ्यासक्रम.

उपरोक्त विषयांच्या संदर्भात एक तज्ज्ञ सल्लागार समिती, पाच विषयांच्या पाच पाठयक्रम विकसन समित्या चर्चा व मान्यतेसाठी **सहपत्र क्र.** ४ मध्ये सादर.

निर्णय – **उपरोक्त विषयावर चर्चा होऊन ३) जेंडर स्कूल आणि सोसायटी ऐवजी लिंग शाळा आणि समाज म्हणावे आणि ४) एकात्मिक शिक्षण ऐवजी समावेशित शिक्षण म्हणावे असे सुचवून उपरोक्त पाचही विषयांच्या पाठ्यक्रम विकसन समित्या आणि बी. एड. शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार मंडळास मान्यता देण्यात आली आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

.३.३ विषय क्र. बी – १/एफ – १७५/२०१७/३.३

. एड. शिक्षणक्रम शुल्काबाबत...

**टिप्पणी** बी. एड. शिक्षणक्रमाचे २०१६ पासून पुर्नरचीत अभ्यासक्रमानुसार विकसनाचे कार्य सुरु आहे. तसेच २०१६ – २०१८ तुकडीपासून पर्यावरण शिक्षण, योगा, कृतिसंशोधन, स्वशोध यासारख्या नवीन प्रात्यक्षिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षणक्रम विकसन व अभ्यासकेंद्र खर्चात वाढ होते. याचा विचार करून बी. एड. शिक्षणक्रम शुल्क रु. ३५,०००/- ऐवजी रु. ४०,०००/- करण्यास मान्यता मिळावी. प्रस्तावित शुल्कातून ५०% रक्कम विद्यापीठ व ५०% रक्कम अभ्यासकेंद्राना अदा करण्यात यावी.

शिक्षणक्रम शुल्क भरतांना विद्यार्थी ५०% रक्कम विद्यापीठात व ५०% रक्कम अभ्यासकेंद्रावर भरतील. त्यामुळे केंद्रांना संपर्कसत्रांचा खर्च करणे सुलभ होईल. वर्षाच्या शेवटी विद्यापीठाने दिलेल्या नमुन्यात केंद्र विद्यापीठाकडे युटीलायझेशन प्रमाणपत्र सादर करतील. अभ्यासकेंद्र खर्चाच्या, मार्गदर्शक सूचना शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडून अभ्यासकेंद्राना कळवण्यात येतील. चर्चा व मान्यतेसाठी सादर .

निर्णय – **बी. एड. शिक्षणक्रम शुल्क एकाचवेळी वाढविण्यापेक्षा दरवर्षी रु. १०००/- ने वाढवावे असे सुचवून यावर्षी सदर शुल्क रु. ३७,०००/- करावे प्रवेशाचेवेळी ५० % विद्यापीठात व ५०% अभ्यासकेंद्रावर विद्यार्थ्यांनी ते भरावे यास मान्यता देण्यात आली. सदर विषयाची वित्त समितीच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. विद्यापीठ शुल्क प्रथम वर्ष रु. १५,३५०/- द्वितीय वर्ष रु. २,१५०/- घेण्यात येतील.**

४७.३.४ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.४

एम.ए.शिक्षणशास्त्र विषयाच्या पुर्नरचनेबाबत..... (सहपत्र- ५)

**टिप्पणी** एम.ए.शिक्षणशास्त्र ह्या शिक्षणक्रमाची यु.जी.सी. नियमांनुसार चार सत्रात विभागणी आणि सत्र निहाय वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहे. त्या संदर्भातील एक टिप्पणी गेल्या शिक्षणशास्त्र परिषदेत मांडण्यात आली होती. त्यावर चर्चेअंती, एक उपसमिती निश्चित करण्यात आली होती. त्याचे सदस्य डॉ. संजिवनी महाले. प्र. संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा, डॉ. विजया पाटील. समन्वयक, एम.ए. शिक्षणशास्त्र, समन्वयक, डॉ. कविता साळुंके शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि डॉ. सज्जन थूल. प्र. संचालक मूल्यमापन विभाग हे होते. या उपसमितीची बैठक घेऊन त्यात उपरोक्त विषयावर तयार केलेली टिप्पणी चर्चा व मान्यतेसाठी **सहपत्र – ५** मध्ये सादर.

निर्णय - **संशोधन विषयाला चारही सत्रात भारांश देता येते का ते पाहावे. शक्य झाल्यास सर्व सत्रात समान वेटेजचा अभ्यासक्रम ठेवावा असे सुचवून सहपत्र – ५ मध्ये सादर केलेल्या एम. ए. शिक्षणशास्त्र विषयाच्या पुर्नरचनेस मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

.३.५ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.५

**ालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम अंतिम मौखिक परीक्षेसाठी परीक्षकांच्या नावास मान्यता देणेबाबतच्या अधिकाराबाबत.......**

**टिप्पणी** – शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची अंतिम मौखिक परीक्षा एप्रिल / मे - २०१७ मध्ये अभ्यासकेंद्राने घेण्यासाठी परीक्षकांची नावे, केंद्राकडून मागविण्यात येत आहे. नावे प्राप्त झाल्यानंतर त्या नावांना मान्यता देण्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना द्यावेत असे वाटते चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय - यावर्षी म्हणजेच एप्रिल / मे २०१७ मधे घेण्यात येणाऱ्या शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या अंतिम मौखिक परीक्षेचे तज्ज्ञ नावांना मान्यता देण्याचे अधिकार संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यास मान्यता देण्यात आली मात्र पुढीलवर्षी सर्व अभ्यासकेंद्रावरील समंत्रकाच्या नावांना मान्यता घेऊन विद्यापीठाने त्यातील नावे केंद्रांना कळवावी असे सूचित करण्यात आले.**

४७.३.६ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.६

**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या बंद झालेल्या अभ्यासकेंद्रावरील अंतर्गत कार्यपूर्ती आणि त्याच्या मुल्यमापनापासून वंचित असलेल्या अध्ययनार्थीच्या मौखिक परीक्षा शिक्षणशास्त्र विद्याशाखेत आयोजित करणेबाबत...... (सहपत्र – ६)**

**टिप्पणी** – शालेय पदविका शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्र डी.एड./ बी.एड. महाविद्यालयात देण्यात आलेली आहेत. अभ्यासकेंद्र संदर्भात NCTE ने २०१४ मधे प्रसिद्ध केलेल्या नियमानुसार काही विद्यालय / महाविद्यालयातील केंद्र बंद करण्यात आली. तर काही केंद्रे अध्यायनार्थी प्रवेशा अभावी बंद झालेली आहेत. त्याच प्रमाणे मागील तीन वर्षात ज्या अभ्यासकेंद्रावर २० पेक्षा कमी प्रवेश झालेले आहेत, ती अभ्यासकेंद्र विद्यापीठाकडून स्थगित करण्यात आलेली आहेत. काही अभ्यासकेंद्रावर प्रवेश न झाल्यामुळे, त्या अभ्यासकेंद्रावर कर्मचारी वर्ग कार्यरत नाही. अशा परिस्थितीत तेथील अध्ययनार्थी मौखिक परीक्षेबाबत चौकशीसाठी गेल्यास त्यांना काहीही माहिती मिळत नाही. म्हणून ज्या अध्ययनार्थींचा शिक्षणक्रम कालावधी संपलेला नाही व सर्व अंतर्गत कार्य व संपर्क सत्र पूर्ण झाली आहे. (सदर अध्ययनार्थींला परीक्षा अर्ज भरावा लागेल) त्या अध्ययनार्थीची अंतिम मौखिक परीक्षा ही शिक्षणशास्त्र विद्याशाखेत घेण्यात यावी. असे वाटते, चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय – ज्यांच्या नोंदणी व पुर्नेनोंदणी कालावधी शिल्लक आहे. परंतु अभ्यासकेंद्र बंद झाले आहे. अशा विद्यार्थ्यांचे संपूर्ण नोंदणी शुल्क घेऊन मौखिक परीक्षा आयोजन विद्यापीठात करण्यात यावे असे सूचित करून सहपत्र – ६ मधील उपरोक्त विषयाला मान्यता देण्यात आली. सदर विषयास विद्वत परिषदेची मान्यता मिळण्यासाठी शिफारस करण्यात आली.**

४७.३.७ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.७

**अभ्यासकेंद्राने पाठविलेल्या मुल्यमापक व परीक्षकांच्या नावाला मान्यता देणेबाबत....( सहपत्र -७)**

णी — शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार २०१६-१७ ह्या शैक्षणिक र्षापासून ८०:२० ह्या पॅटर्न प्रमाणे अंतिम परीक्षा होणार आहे. त्या संदर्भात अभ्यासकेंद्राकडून प्राप्त झालेल्या नावांना प्राश्निक / मुल्यमापक / परीक्षक म्हणून मान्यता देणेबाबत, सहपत्र -७ चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय - शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या २०१६ — १७ ह्या शैक्षणिक वर्षापासून ८० : २० ह्या पॅटर्न प्रमाणे होणाऱ्या अंतिम परीक्षेसाठी सहपत्र — ७ मधील प्राश्निक मूल्यमापन, परीक्षक नावांना परीक्षा विभागाच्या बी. ओ. ई. परिषदेची मान्यता घ्यावी असे सूचित करण्यात आले.**

४७.३.८ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.८

**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) शिक्षणक्रमाची २०१६ — २०१७ तुकडी पासून कार्यवाहीत आणावयाची संपर्कसत्र वेळापत्रक योजनेबाबत.........(सहपत्र — ८)**

**टिप्पणी** — बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) शिक्षणक्रमाच्या २०१६ तुकडी पासून विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णय ८०:२० पॅटर्न चा विचार करता (८० लेखी व २० स्वाध्याय प्रात्यक्षिके) या शिक्षणक्रमाच्या कार्यवाहीत काही बदल करण्यात आले. शिक्षणक्रम कालावधी, मूल्यमापन प्रक्रिया, अभ्यासक्रम घटक इ. या नवीन बदलाचा विचार करून शिक्षणक्रम संपर्कसत्र योजना तयार करण्यात आली आहे. ती योजना २०१६-१७ तुकडी पासून कार्यान्वित करण्यात आली. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर. **(सहपत्र — ८)**

**निर्णय — बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-३१) शिक्षणक्रमाच्या २०१६-२०१७ तुकडीच्या सह्पत्र — ०८ मधील संपर्कसत्र वेळापत्रक व कार्यवाही योजनेस मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयाची विद्वत्त परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

४७.३.९ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.९

**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C — ३१) या शिक्षणक्रमात २०१६-२०१७ पासून कार्यान्वित केलेल्या मानधन वितरण योजनेच्या मान्यतेबाबत.......(सहपत्र — ९)**

**टिप्पणी** — बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C — ३१) या शिक्षणक्रमात २०१६ च्या तुकडीपासून केलेल्या बदलाचा विचार करता अभ्यासकेंद्र मानधन वितरणात काही बदल करण्यात आले. या शिक्षणक्रमाचे एकूण शुल्क रु.१५७५/- आहे. त्यापैकी विद्यापीठ शुल्क रु. १०००/- व अभ्यासकेंद्र शुल्क रु.५७५/- आहे. अभ्यासकेंद्र शुल्काचे मानधन वितरण करण्यासाठी विविध शिक्षणक्रमाच्या कृतींचा विचार करून रु. ५७५/- चा मानधन तक्ता करण्यात आलेला आहे. **(सहपत्र — ९)** कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय- बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (c-३१) या शिक्षणक्रम २०१६-२०१७ पासून कार्यन्वित केलेल्या (सहपत्र — ९) मधील मानधन वितरण योजनेस मान्यता देण्यात आली. सदर विषयाच्या मान्यतेसाठी वित्त समितीकडे शिफारस करण्यात आली.**

४७.३.१० विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.१०

**शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C — ३५) शिक्षणक्रम २०१६-२०१७ तुकडी पासून कार्यन्वित केलेली मानधन संपर्कसत्र योजना मान्यतेबाबत.......(सहपत्र — १०)**

**टिप्पणी** – शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C – ३५) या शिक्षणक्रमात २०१६-२०१७ तुकडीपासून विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार ८०:२० पॅटर्न प्रमाणे (८०गुण लेखी व २०गुण स्वाध्याय प्रात्यक्षिके) बदल करण्यात आले. या बदलांचा विचार करता मानधन वितरणातही बदल करणे आवश्यक वाटते. शिक्षणक्रमाचे एकूण शुल्क रु.३१२०/- आहे. त्यापैकी विद्यापीठ शुल्क रु. २०००/- व अभ्यासकेंद्र शुल्क रु. ११२०/- आहे. अभ्यासकेंद्र शुल्काचे मानधन वितरण करण्यासाठी विविध शिक्षणक्रमाच्या कृतीचा विचार करून रु.११२०/- चा मानधन तक्ता तयार करण्यात आलेला आहे. **सहपत्र – १०** कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय**- शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C – ३५) शिक्षणक्रम २०१६-२०१७ तुकडी पासून कार्यान्वित केलेली सहपत्र – १० मधील मानधन योजनेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. सदर विषयाच्या मान्यतेसाठी वित्त समितीकडे शिफारस करण्यात आली.

**४७.३.११ विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१७/३.११**

ऐनवेळेचे विषय.

**१) विषय - घरकामगार कल्याण पदविका शिक्षणक्रमाचे अध्ययनार्थी प्रवेश शुल्क रु.१५००/ - विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार निश्चित केले आहे.सदर शुल्क घरकामगार महिलांना भरणे शक्य होत नाही म्हणून मागील दोन वर्षात या शिक्षणक्रमासाठी प्रतिसाद मिळाला नाही.**

विद्यापीठाचे सामाजिक दायित्व म्हणून प्रवेशासाठी रु.२००/- सवलतीचे शुल्क स्वीकारून प्रवेश द्यावा.तसेच अभ्यासकेंद्र खर्चासाठी रु.५००/- प्रती अध्ययनार्थी निधी शिक्षणशास्त्र विद्याशाखाअंतर्गत देण्यात यावा.म्हणजेच प्रती विद्यार्थी रु.३००/- इतका खर्च विद्यापीठाला करणे अपेक्षित आहे.या शिक्षणक्रमाची उपयोगिता व सामाजिक दायित्व लक्षात घेऊन सदर योजना विशेष बाब म्हणून मान्यतेसाठी सादर

**निर्णय** :- यासंदर्भात चर्चा करताना घरकामगार कल्याण पदविका शिक्षणक्रम समाजाभिमुख शिक्षणक्रम असल्यामुळे विद्यापीठ शुल्क घेण्यात येऊ नये आणि विद्यापीठाने अभ्यासकेंद्रांचा खर्च करावा. व विद्यार्थ्यांना विनाशुल्क हा शिक्षणक्रम पुरवावा यास तत्वतः मान्यता देण्यात आली. मात्र प्रत्यक्षात अभ्यासकेंद्र खर्च विद्यापीठ कसे व कोणत्या निधीतून देऊ शकेल या संदर्भात मा.कुलगुरूंशी चर्चा करून निर्णय घ्यावा असे सूचित करण्यात आले.

**२) एम.एड. नोंदणी / पुनर्नोंदणी संपल्यानंतर मुदतवाढ देणेबाबत ....**

**निर्णय :- पुनर्नोंदणी कालावधी संपलेल्या विद्यार्थ्यांचा मुदतवाढ देणेबाबत विचार करू नये. मात्र ज्यांचा नोंदणी कालावधी संपला असेल त्यांना शेवटच्या एम.एड. तुकडीचे म्हणजेच २०१४ तुकडीचे शिक्षणक्रम शुल्क रु.२२,०००/- आकारून नियोजित पुनर्नोंदणी कालावधी द्यावा. व त्या काळात त्यांचे उर्वरित कार्य**

**विद्यापीठातील अभ्यासकेंद्रावर पूर्ण करून घ्यावे असे सूचित करून सदर विषयास मान्यता देण्यात आली.सदर विषयाची विद्वत्त परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.**

**३) बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (c-३१) या शिक्षणक्रम २०१६-२०१७ पासून प्रात्यक्षिक कार्य बदल बाबत कार्योत्तर मान्यतेसाठी ....**

**टिप्पणी :** बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (c-३१) शिक्षणक्रम २०१६ शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार ८०:२० पॅटर्ण प्रमाणे ( ८० गुण लेखी व २० गुण स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य) बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे अंतर्गत कार्यासाठी अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य निश्चित करण्यात आले आहे. स्वाध्यायाचे प्रश्न हे स्वाध्याय पुस्तिकेप्रमाणे व प्रात्यक्षिक कार्य खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर **( परिशिष्ट क्र.१)**

**निर्णय : बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (c-३१) या प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमनिहाय निश्चित केलेले स्वाध्याय प्रश्न व प्रात्यक्षिक कार्यास या तुकडी पुरती कार्योत्तर मान्यता देण्यात आली. मात्र यापुढील काळात हा प्रोफेशनल कोर्स असल्याने सैद्धांतिक भागास ५०% व प्रात्यक्षिक भागास ५०% वेटेज देण्यात येऊन नवीन संरचना तयार करावी असे सूचित करण्यात आले.**

**४) शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र ( C- ३५ ) शिक्षणक्रम २०१६-२०१७ पासून प्रात्यक्षिक कार्य बदलाबाबत ...**

**टिप्पणी** :-शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र (C-३५) शिक्षणक्रम २०१६ शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठ धोरणात्मक निर्णयानुसार ८० :२० पॅटर्न प्रमाणे ( ८० गुण लेखी व २० गुण स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य ) बदल करण्यात आलेला अआहे. त्यामुळे अंतर्गत कार्यासाठी अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य निश्चित करण्यात आले आहे. स्वाध्यायाचे प्रश्न हे स्वाध्याय पुस्तिकेप्रमाणे व प्रात्यक्षिक कार्य खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ....

**निर्णय :- शालेय व्यवहारासाठी माहिती संप्रेषण आणि तंत्रविज्ञान प्रमाणपत्र ( C- ३५ ) शिक्षणक्रम २०१६पासून कार्यान्वित केलेल्या अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**५) बी.एड शिक्षणक्रम परीक्षा अर्ज भरताना प्रात्यक्षिक कार्य पूर्तता प्रमाणपत्राबाबत....**

**निर्णय** : यापूर्वी बी.एड शिक्षणक्रम परीक्षा अर्ज भरताना प्रात्यक्षिक केल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य होते, परीक्षा विभागाच्या तांत्रिक अडचणी विचारात घेता त्याऐवजी २०१७ पासून अंतर्गत कार्य पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेला बसू द्यावे. ज्यामुळे सदर प्रमाणपत्र परीक्षा अर्जासोबत जोडणे आवश्यक नसेल.मात्र अभ्यासकेंद्राकडून अंतर्गत कार्याचे गुण प्राप्त झाल्याशिवाय त्याचा निकाल काहीर करू नये. असे ठरले .सदर विषयाची विद्वत्त परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली .

**६ ) बी.एड विशेष शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना एम.ए. शिक्षणशास्त्रात प्रवेश देणे बाबत .....**

**निर्णय : बी.एड. विशेष शिक्षण आणि बी.एड.जनरल मधील अनिवार्य विषय समान आहेत.त्यामुळे बी.एड. विशेष शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना एम.ए. शिक्षणशास्त्र या शिक्षणक्रमास प्रवेश देण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषयाची विद्वत्त परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली .**

**डॉ. कविता साळुंके .**
**सचिव , शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद**

**डॉ. संजीवनी महाले .**
**प्र. संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

School of Education * Y.C.M.O.U., Nashik *